दिनांक 08/09/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 85

विषय – महाराष्ट्र शासन नगरपविकास विभाग यांचेकडील दिनांक 29 ऑगस्ट 2023 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टपुर्ण कामासाठी विशेष अनुदान योजने अंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 10 कामासाठी 1.05 कोटी अनुदान मंजूर केले आहे यास प्रमाणपत्र मिळणेबाबत मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा यांचे दाखल दिनांक 04/09/2023 रोजीचे पत्रावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1)मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 07/09/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, क्र.नपावै-023/प्र.क्र.327(31)/नवि-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 29 ऑगस्ट 2023

3) मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडील पत्र जा.क्र.1131/2023 दि.04/09/2023

संदर्भ क्र.2 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 10 कामांसाठी 1.05 कोटी अनुदान मंजूर करणेत आलेले आहेत. सदरची कामे करणेसाठी शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वीत यंत्रणा आहे. संदर्भ क्र. 3 नुसार मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांनी प्रमाणपत्र मागणी करणेत आलेली आहे. सदर शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कामे खालीलप्रमाणे.

| अ.नं | प्रस्तावित कामांची नावे |
|---|---|
| 1. | प्रभाग क्र.7 अंतर्गत यशवंतनगर रस्ता क्र. 4 रस्त्याच्या आर.सी.सी. गटर करणे. |
| 2. | प्रभाग क्र.3 अंतर्गत हजारे मळा येथून जुना वासुंबे रोड ते बापट विहीर आर.सी.सी. गटर करणे. |
| 3. | प्रभाग क्र. 10 अंतर्गत शितोळे गल्ली येथील चंद्रशेखर गायकवाड घर ते अर्जुन गायकवाड घरापर्यंत आर.सी.सी. गटर करणे. |
| 4. | प्रभाग क्र. 2 अंतर्गत ब्रम्हदेव बाबर घर ते अशोक जाधव घर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व बंदिस्त गटर करणे. |
| 5. | प्रभाग क्र. 1 अंतर्गत अशोक शेट्टी घर ते बिसूरकर कॉम्प्लेक्स रस्ता डांबरीकरण करणे. |
| 6. | प्रभाग क्र.4 अंतर्गत गुंफा येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे व अंडरग्राऊंड पाईप टाकणे. |
| 7. | प्रभाग क्र. 8 मधील शाहुनगर परिसरातील गटरची कामे करणे. |

पान नं. 2 वर

| | |
|---|---|
| 8. | मुंढेमळा ते मेटकरी वस्ती गटर काम करणे. |
| 9. | कराड रस्ता ते नेवरी रस्ता शिवाजीनगर येथील रस्ते सुधारणा करणे. |
| 10. | विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 10 येथील संभाजीनगर येथे कमरुद्दीन मिस्त्री ते निकम बापू रस्ता डांबरीकरण करणे. |

वरील कामांचा दोषदायित्व कालावधी पुर्ण झाले नंतर देखभाल व दुरूस्ती करणेची जबाबदारी नगरपरिषदेची राहील. सदर कामांसाठी लागणा-या आवश्यक त्या शासकीय विभागांच्या परवानग्या सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम) सांगली यांनी घेणेच्या आहेत. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, क्र.नपावै-023/प्र.क्र.327(31)/नवि-16 मंत्रालय,मुंबई दिनांक 29 ऑगस्ट 2023 मधील मुद्द क्रं.8 अ नुसार सदर प्रकल्पा अंतर्गत कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणी करावीत. तरी वरील कामांना मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडून मागणी करणेत आलेले प्रमाणपत्र नगरपरिषद अटी व शर्तीस अधिन राहून देणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा